नव्हतं, तु झाडाला बिलगुन बसला होतास. आपण पुष्कळदा त्या माणसासारखं आपल्या दुःखाला कवटाळून बसतो. कुणीतरी आपली सुटका केली पाहिजे..... पुनम, मी संत नसलो तरी साधनाचे हात अलगद सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे....''[५] अशा वाक्यामधून नाटकातील दुःखाची कल्पना लक्षात येते. वैभवच्या स्मृती दिना निमित्य साधना आणि मोनिमॉय अनाथ आश्रमातील मुलांना गोड जेवण देतात. वैभवचं दुःख हळू हळू ओसारायला लागतं. तेच बाहेरून निरंजनचा फोन येतो. डोंगरावरून पाय घसरून पुनम खाईत कोसळली, नेमकं वैभच्या स्मृतीदिवशी पुनमचा अपघात होतो. तिही निघुन जाते. नाटकात पुनम आणि वैभव ही दोन तरूण आहेत ज्यांचं एकमेकांवर जीव होतं. नकळत वैभव ज्याप्रमाणे या जगातून निरोप घेतो तशीच पुनम सुध्दा निघून जाते. वैभवच्या जाण्याने मोनिमॉय, साधना कफल्लक झाली होती. त्यांच्या डोळयात मुलाच्या प्रेमाची ज्योत म्हणून पुनम हीच साक्ष होती परंतु तीच्या जाण्याने नाटकात पुन्हा दुःखाचीच अवकळा निर्माण झालेली आहे.

*आता चालणे गां । पैल तिरासाठी*
*जीव कासाविस । मुक्त व्हावा ॥*

*दुःख दाटल्याने । काळीज भरले*
*कधी ऐकशील । दुःख टाहो ॥*

*एका जन्माठायी । जीव हंबरला*
*कसा जीवतोलू । जन्मोजन्मी ॥6*

अशा अभंगाच्या ओळी नाटकातून शेवटी दिल्या आहेत. साधना आणि मोनिमॉय यांच्या पदरात उरलेलं दुःख वरील ओळी दर्शवितांना दिसतात. नाटककार पराग घोंगे यांनी कधी ऐकशील का रे ? हे एक वास्तव दर्शी नाटक रसिकांना दिले आहेत. आज समाज विचारतेच्या पैलूत आपल्या स्वप्नाचे अस्तित्व कसे गमावतो हा विचार नाटकातून दिसतो. साधना सुशिक्षित मोनिमॉय नोकरीवर दोघेही सधन तरीही विचारतेची पायरी गमावलेले. यातून त्यांचा मुलगा अपघातात मृत्यू पावतो, पुढे पुनमही जाते. नाटकातील अवयव दानाची कल्पना आदर्श आहे. किडनी देण्याचा प्रयत्न असफल ठरला तरी नेत्रदान यशस्वी ठरतो. असे असले तरी संपूर्ण नाटक दुःखाभोवती फिरते. जणू माणसांच्या धावत्या आणि विचारशून्यतेतून हे दुःख निर्माण झाले आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ :**

१. डॉ. बगले, माणिक माधव (संपादक), १९७५ नंतरचे मराठी नाटक : आशय आणि रचना, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, प्र.आ. डिसें. २०१७ पृ.क्र. ३४०
२. तत्रैव, पृ.क्र. ३४१
३. घोंगे पराग, चक्रव्युह आणि इतर नाटके, विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. एप्रिल २००९ पृ.क्र. ३८
४. तत्रैव, पृ.क्र. ५६
५. तत्रैव, पृ.क्र. ६०
६. तत्रैव, पृ.क्र. ६

# एकविसाव्या शतकातील मराठी साहित्यातील विविध प्रवाह

**प्रा. डॉ. चंद्रशेखर सुधाकर देवघरे**
*स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय*
*गडेगाव ता. लाखनी जि. भंडारा*

आधुनिक काळात मराठी साहित्यात अनेक साहित्य प्रकार व साहित्यप्रवाह उदयास आले. काळानुरुप साहित्यात होणारे परिवर्तन व पडसाद ही आपल्याला त्या-त्या साहित्य कृतीत जाणवलेले आहे. कथा कादंबरी, नाटक, कविता, प्रवास वर्णन, व्यक्तिचित्रण, निबंध, चरित्र, आत्मचरित्र व आत्मकथन हे वाङ् मय प्रकारचे आजही एकविसाव्या शतकात एक पूर्णता प्रगल्भ व साकारलेले असून प्रत्येक वाङ् मय प्रकाराचा साहित्यकृती स्वतंत्रपणे नवा अविष्कार घडून आलेला दिसून येते .

विशेषतः सामाजिक जाणिवेच्या भावनेतून परिपक्व अशी साहित्य निर्मितीची प्रक्रिया ही खऱ्या अर्थाने अव्वल इंग्रजी कालखंडापासून आरंभ झाली आहे .ह्या तेव्हा साहित्य प्रकारात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, ऐतिहासिक तसेच शैक्षणिक दृष्ट्या देखील विविध अंगाने नव्याने भर टाकण्याचे कार्य हे मराठी साहित्यात दिसून येते.

साहित्यकृती निर्मितीचा हेतू हा मुळात प्रवृत्ती व प्रवाह, आशय व अभिव्यक्ती ने पूर्णताः साकारलेला असून आजही नव्याने मराठी साहित्यात भर टाकण्याचे कार्य करीत आहे. प्रत्येक साहित्यकृतीत नवा विचार, नवी प्रेरणा, हेतू, आधुनिकता व वस्तुनिष्ठता विभिन्न प्रकारे दिसून येते.

**नवनवे संशोधन, संशोधनाची मांडणी व व्याप्ती**

आजच्या आधुनिक काळात मराठीत वा मराठी साहित्यात नव नवे संशोधन होतांना दिसून येते. ह्या संशोधनाची मांडणी करताना संशोधनाचा हेतू, संशोधनाची व्याप्ती, संशोधन पद्धती. (ज्यात निरीक्षण, अवलोकन, संपादन, संकलन विश्लेषण, आकलन, आस्वा, मूल्यमापन, तुलना, परिचर्चा, मुलाखत इत्यादी पद्धतींचा अवलंब केला जातो.) गृहीतके (मराठीतील प्रत्येक साहित्यकृती ही तत्कालीन समाजाचा दस्तऐवज असून त्यातून तत्कालीन समाजाचे लेखन हे पुढच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत असते)

साहित्यप्रकार व साहित्यकृतीतून निर्माण झालेली सामाजिक जाणीव, समाजवास्तव व वस्तुस्थिती आजवर मराठी साहित्यात एकंदरीत अनेक वाङ् मय प्रकार उदयास आले असून त्यात जीवन संघर्षाचा शोध घेणे, जीवनातील घटना व प्रसंगाचे वर्णन करणे, शिक्षणविषयक चिंतनाचा परामर्श घेणे, तत्पूर्वी व आजचे एकविसाव्या शतकातील समाज जीवनाचे वास्तव व वस्तुस्थितीचे हुबेहुब चित्र समोर मांडणे त्या ह्या सर्वच उदात्त हेतूने मराठी साहित्याचे निर्मितीस आले. किंबहुना त्यात काळानुरूप अनेक स्थित्यंतरेही घडत गेलेली आहे. सामाजिक भान, समाजजीवनाचे अंतरंग, सामाजिक वस्तुस्थिती, सामाजिक मूल्यांकन हे सर्व त्या त्या साहित्य प्रकारात दिसून येते. नववी प्रसंगानुरूप त्यातील पडसाद व परिणाम ही प्रखरतेने जाणवते.

प्रत्येक साहित्यकृतीतील जीवन संघर्षाचे स्वरूप, व्यक्ति रेखा, आशय व अभिव्यक्ती. (सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, सांस्कृतिक वा आर्थिक दृष्ट्या) प्रतिमा व प्रतिकांचा वापर, निवेदनशैली, भाषाशैली, वर्णन कौशल्य आणि प्रसंगचित्रणे, वांङ:मयीन व सामाजिक कर्तुत्व प्रत्येक साहित्यकृतीतील मूल्यमापन हे सर्वच मराठी साहित्यकृतीची वैशिष्ट्य आहे, असे म्हणावे लागेल.

**साहित्यप्रकाराची संकल्पना व व्यवहार समीक्षा**

साहित्य प्रकार म्हणजे लेखकाच्या हाताशी असलेल्या व वाचकांना पूर्वज्ञात असलेला सौंदर्यात्मक रचनातंत्राचे संकलित प्रस्तुतीकरण असते. कथात्मक, नाट्यात्मक व भावात्मक हे देखिल मूलभूत साहित्यप्रकार आहेत. ज्यातून अनेक उपप्रकार ही उदयास आले आहे. दलित , ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी, तौलनिक लोकसाहित्य महानुभाव, संतसाहित्य, राष्ट्रीयसाहित्य असे अनेक साहित्य प्रकार ही मराठीत पाहायला मिळतात. अनेक साहित्यप्रकार वा साहित्य प्रवाह हे संस्कृती सापेक्ष असून त्या- त्या साहित्य परंपरेत त्याचे स्वतंत्र असे स्थान आहे.

विशेषता साहित्य प्रकारांचे साहित्य व्यवहारात अस्तित्व आणि उपयुक्तता मानलेली आहे त्याचप्रमाणे साहित्य प्रकार व साहित्य प्रवाहांची संकल्पना ही लवचिक व परिवर्तनशील असावी. असेही अपेक्षित आहे.

समीक्षा व्यवहारात तुलनात्मक मूल्यमापनासाठी साहित्यप्रकारही उपयुक्त ठरतात. काहीशा साहित्यकृती ह्या एकसारख्या वाटत असल्या तरी ते साहित्यप्रकार भिन्न,

विभिन्न स्वरूपाचे असतात. उदाहरण कादंबरी कथा व आत्मचरित्र हे सारखे जरी वाटत असले तरी त्यातील गुण, साधर्म्य पडताळा केल्यास ते अलग-अलग व स्वतंत्ररित्याच साकारले गेले आहे.

प्रत्येकच वाङ्:मय प्रकाराचे देखील उपप्रकार पडलेले आहे. उदा. जसे कथा, दीर्घकथा, पटकथा, रहस्यकथा इ. अनेक प्रकारही पहावयास मिळतात. जे मराठीत नव्याने साकारले व अविष्कारीत झालेले आहे.

प्राचीन काळापासून ते आजच्या थेट एकविसाव्या शतकापर्यंत ज्याही पण साहित्यकृती व साहित्य प्रवाह साकारले गेले त्यात समीक्षात्मक ग्रंथ ही निर्माण झालेले आहे. वाङ् मय प्रकारावर आधारीत तशी पडताळणी, मूल्यमापन केले असून नवनवे समीक्षक निर्माण होऊन समीक्षात्मक मूल्य मांडणीही पाहायला मिळते. साहित्य हे तेव्हाही प्रगल्भ होते व आजही पूर्णपणे प्रगल्भ व अविष्कृत होण्याच्या मार्गावरच आहे.

**समारोप-**

आजच्या एकविसाव्या शतकातही प्राचीन काळापासून, अव्वल इंग्रजी कालखंडापासून, मध्ययुगीन काळापासून मराठी साहित्यात अनेक साहित्यप्रकार व साहित्य प्रभावाची नव्याने भर पडलेली दिसून येते. किंबहुना विभिन्न आशय व अभिव्यक्तीने ते साकारलेले ही आहे. ह्या साहित्य प्रवाहातून समीक्षेवर भर टाकण्यात येत असून मराठी साहित्याने वाचकांच्या, श्रोत्यांच्या व अभ्यासकांच्या मनात महत्त्वपूर्ण मानाचे स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे, असे म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ सूची-**

1. *मराठी वाङ् मयाचा इतिहास (खंड -5 व 6) संपादक –गो. मा. कुलकर्णी व व. दी. कुलकर्णी*
2. *नव समीक्षा आणि विचार प्रवाह, मेहता पब्लिकेशन्स, पुणे – 1982*
3. *आबेडकरवादी मराठी साहित्य एभीमरत्न प्रकाशन, प्रथम आवृत्ती, नागपूर – 1999*
4. *साहित्याचे मानदंड, पाप्युलर प्रकाशन, मुंबई – 1962*
5. *1960 नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, आनंद यादव, मेहता पब्लिकेशन्स, पुणे*
6. *मराठी वाङ् मयाची सद्यस्थिती, मोतीबुलासा', संपादक द.दि. पुंडे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – 2000*